


मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक २२ सप्टेंबर २०२३। पान १


# गणेशोत्सवात ध्वनिक्षेपक वापरासाठी सहा दिवस रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी!

## जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांचे आदेश

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सार्वजनिक गणेश मंडळाला ध्वनी प्रदुषण संबंधी नियमांचे पालन करुन गणेशोत्सवादरम्यान ५ ऐवजी ६ दिवस सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर करण्यास परवानगी देण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी निर्गमित केला आहे. केंद्र शासनाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम २०१७ अन्वये सण उत्सव कालावधीसाठी १५ दिवसांसाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाच्या वापरासाठी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यासाठी सूट देण्यात आली आहे. त्यानुसार १६ फेब्रुवारी २०२३ च्या जिल्हाधिकारी



यांच्या आदेशानुसार सन २०२३ च्या सण उत्सवांकरिता १३ दिवस निश्चित करुन २ दिवस राखीव ठेवण्यात आले होते. त्यामध्ये गणेशोत्सवाकरीता ५ दिवस निश्चित करण्यात आले होते. तथापि, विविध लोकप्रतीनिधी व गणपती मंडळे यांनी पुणे शहरात आणि जिल्ह्यात सार्वजनिक गणपती उत्सवामधील सातव्या दिवशी गणपती विसर्जन केले जात असल्याने सदर दिवसही विशेष बाब म्हणून वाढवून मिळण्याबाबत विनंती केली होती. त्याबाबत पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांनीही परवानगी देण्यात हरकत नसल्याचे कळविले आहे. त्यानुसार राखीव २ दिवसांपैकी १ दिवस गणेशोत्सवासाठी (गणेशोत्सवातील सातवा दिवस) सूट देण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांनी जारी केले आहेत. गणेशोत्सवासाठी यापूर्वीच्या आदेशानुसार शनिवार २३ सप्टेंबर (पाचवा दिवस- गौरी विसर्जन), रविवार २४ सप्टेंबर (सहावा दिवस), मंगळवार २६ सप्टेंबर (आठवा दिवस), बुधवार २७ सप्टेंबर (नववा दिवस), गुरुवार २८ सप्टेंबर (दहावा दिवस- अनंत चतुर्दशी) असे पाच दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यास परवानगी देण्यात आली होती. आता नव्याने सोमवार २५ सप्टेंबर २०२३ (सातवा दिवस) सह एकूण सहा दिवस नियमांचे पालन करून ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यास परवानगी देण्यात येत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### सकाळी ६ ते रात्री १२ पर्यंत परवानगी

» केंद्र शासनाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम २०१७ अन्वये सण उत्सव कालावधीसाठी १५ दिवसांसाठी ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धकाच्या वापरासाठी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत वापर करण्यासाठी सूट देण्यात आली आहे. त्यानुसार १६ फेब्रुवारी २०२३ च्या जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार सन २०२३ च्या सण उत्सवांकरिता १३ दिवस निश्चित करुन २ दिवस राखीव ठेवण्यात आले होते.

# हिल इंडिया लिमिटेडच्या कामगारांचे थकीत वेतन द्या!

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्रीय रसायन मंत्र्यांकडे मागणी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** केंद्र सरकारच्या रसायन मंत्रालयाअंतर्गत मावळ लोकसभा मतदारसंघातील रसायनी येथील हिल इंडिया लिमिटेड कंपनीमधील कामगारांचे मागील नऊ महिन्यांपासूनचे वेतन थकले आहे. कामगारांची उपासमार सुरु असून त्यांनी उपोषण सुरु केले आहे. या कामगारांचे तत्काळ थकीत वेतन अदा करावे अशी आग्रही मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

केंद्रीय रसायन मंत्री मनसुख मांडवीया यांची खासदार बारणे यांनी भेट घेतली. कामगारांची व्यथा मांडली. त्याबाबतचे सविस्तर निवेदन त्यांना दिले आहे. त्यात म्हटले आहे की, भारत सरकारने १९५४ मध्ये रसायनी येथे या कंपनीची स्थापना केली. या कंपनीत रसायनिक खते तयार होतात. कंपनीतील कामगारांचे नऊ महिन्यांपासून वेतन थकले आहे. त्यांना कोणत्याही सुविधा मिळत नाहीत. कामगारांचे वेतनाचा



प्रश्न सोडविण्याची विनंती करुनही हा प्रश्न सुटला नाही. त्यामुळे कामगारांनी ११ सप्टेंबरपासून उपोषण सुरु केले आहे. कामगारांचे जानेवारीपासूनचे वेतन थकले आहे. २८ महिन्यांचा ६२ कोटी रुपये भविष्य निर्वाह निधी कामगारांना द्यायचा आहे. कामगारांना २०१७ पासून सीओडी लागू करावी. सुरक्षा, अग्निशमनची व्यवस्था पुन्हा द्यावी. कंपनी व्यवस्थित चालविण्यासाठी पूर्णवेळ अध्यक्षाची तातडीने नियुक्ती करावी. मार्च २०२२ नंतर सेवानिवृत्त झालेल्या ६० कर्मचा-यांची ग्रॅच्युटी द्यावी. कंपनी पुन्हा सक्षमपणे कार्यान्वित करण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करावा. कंपनी सुरु ठेवावी. कंपनी सुरु ठेवणे शक्य नसेल. तर, स्वेच्छा निवृत्ती (व्हीआरएस) लागू करावी. कामगारांची थकीत सर्व देणी द्यावीत अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

### तत्काळ वेतन देण्याचे आदेश..

» हिल इंडिया लिमिटेडच्या केरळ, पंजाबमधील बठिंडा येथील दोन्ही युनिट बंद करण्यात येतील. रसायनी युनिट चालू ठेवण्यात येईल. युनिटमधील सर्व कामगारांचे वेतन देण्याबाबत मंत्री मांडवीया यांनी सचिवांशी चर्चा केली. तत्काळ वेतन देण्याचे निर्देश दिले. त्यामुळे लवकरच कामगारांचे थकित वेतन मिळेल असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.

# महापालिकेच्या शाळा दर शनिवारी दप्तराविना!

## नाविन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या खांद्यावरचा भार हलका

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शैक्षणिक क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सर्व १२८ शाळांमध्ये दर शनिवारी 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम सुरू केला आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या खांद्यावरचा भार हलका झाला असून अभ्यासाव्यतिरिक्त नवनवीन गोष्टी शिकण्याचा उत्साह त्यांच्यामध्ये बळावला आहे. आता प्रत्येक शनिवारी महापालिकेच्या शाळांमधील वर्ग जल्लोषाने गजबजून जातात. शनिवार जो शाळेचा दिवस असतो तो आता गीत, कविता, गायन, प्रश्नमंजुषा, शाब्दिक खेळ, पाककला, चित्रकला, मैदानी खेळ अशा विविध उपक्रमांनी भरलेला आहे. 'दप्तराविना शाळा' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारा तसेच नवनवीन गोष्टी शिकण्याची आवड निर्माण करणारा आहे. या उपक्रमामुळे महापालिका शाळा कल्पकतेचे केंद्र बनल्या असून गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याच्या कलेत प्रभुत्व मिळवत आहेत आणि यामुळे विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेला तसेच पर्यावरणपूरकतेला या दोन्ही गोष्टींना प्रोत्साहन मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी अशा उपक्रमांना प्रोत्साहन दिल्यास त्यांची शाळा उपस्थितीची गोडी वाढेल आणि आठवड्याभराच्या शारिरिक, मानसिक त्रासातून मुक्तता मिळेल. महापालिका शाळांमध्ये या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून काही विद्यार्थी पाककलेचे धडे घेत आहेत. तसेच पाककलेसोबत त्यांना टीमवर्कचे महत्त्वही समजत आहे. त्याचसोबत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना बागकाम तसेच रोपांची लागवड करणे शिकविले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरणाबद्दल मौल्यवान ज्ञान तर प्राप्त होत आहेच पण त्यांच्यामध्ये जबाबदारी आणि संयमाची जाणीवही निर्माण होत आहे. 'दप्तराविना शाळा' उपक्रमाने विद्यार्थ्यांना पारंपरिक अभ्यासक्रमाबाहेरील त्यांच्या आवडी जाणून घेण्याची संधी मिळाली आहे. नृत्य, संगीत, चित्रकला किंवा नाटक यांसारखे कलात्मक उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांची वेगळी बाजू आत्मसात करण्यासाठी आणि त्यांच्या प्रतिभेला जोपासण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, दप्तराविना शाळा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची कल्पकता तर वाढलीच आहे पण त्यांच्या कौशल्यालाही वाव मिळाला आहे. पालक आणि शिक्षकांनीही या अग्रेसर विचारसरणीचे कौतुक केले आहे. या उपक्रमाने विद्यार्थ्यांना जड दप्तरांच्या शारीरिक ओझ्यापासून मुक्ती तर दिलीच पण त्यांचा मानसिक भारही हलका केला आहे. जिज्ञासा आणि जीवन कौशल्ये यावर भर देऊन महापालिका शाळा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना शाळेच्या वेशीपलीकडे सतत विकसित होत असलेल्या धावपळीच्या जगात पाऊल ठेवण्यास मदत करत करतील असा विश्वास आयुक्त शेखर सिंह यांनी बोलताना व्यक्त केला.



### कौशल्यालाही वाव मिळेल

» 'दप्तराविना शाळा' उपक्रमाने विद्यार्थ्यांना पारंपरिक अभ्यासक्रमाबाहेरील त्यांच्या आवडी जाणून घेण्याची संधी मिळाली आहे. नृत्य, संगीत, चित्रकला किंवा नाटक यांसारखे कलात्मक उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांची वेगळी बाजू आत्मसात करण्यासाठी आणि त्यांच्या प्रतिभेला जोपासण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत. दप्तराविना शाळा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची कल्पकता तर वाढलीच आहे पण त्यांच्या कौशल्यालाही वाव मिळाला आहे.

# आधी १४ वर्षे वनवास मग घडले प्रभू श्रीराम; हेच जीवनाचे सार!

## 'रेकॉर्ड ब्रेक' गर्दीने श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचा समारोप

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** "संसारात जन्म घेतला की, वाट्याला येणारे दु:ख तुम्हाला भोगावेच लागणार आहेत. प्रभू श्रीराम, श्रीकृष्ण, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांच्या वाट्याला आलेल्या दु:खापासून ते चुकले नाहीत. दु:ख पचवून पुन्हा उभे राहण्याची क्षमता असल्यानेच त्यांनी संघर्ष केला. त्यामुळेच त्यांना देवपद, संतपद प्राप्त झाले. भगवान राम यांनी १४ वर्षे वनवास भोगल्यानंतरच ते 'प्रभू श्रीराम' होवू शकले. कठीण प्रसंगातून गेल्याशिवाय कुणालाही देवपद, संतपद मिळत नाही, असा विचार आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा वाचक पंडित प्रदीपजी मिश्रा यांनी दिला. लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवाराच्या वतीने सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर 'श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा वाचन' सोहळा आयोजित करण्यात आला होता. लाखो भाविकांच्या उपस्थितीत सोहळ्याची आज सांगता करण्यात आली. पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर जगताप या कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक आहेत. सोहळ्याच्या सांगता समारोहाच्या निमित्ताने भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ व विक्रांत पाटील, भाजपा प्रवक्ते संदीप खर्डेकर, पिंपरी-चिंचवड प्रभारी ॲड. वर्षा डहाळे, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी सुखदेव बनकर, मारुतराव साळुंखे, माजी महापौर दत्तात्रय गायकवाड, पुणे मनपा स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विशाल तांबे, माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, हभप पंकज महाराज गावडे, हभप नितीन महाराज गोरे, संत तुकाराम महाराज संस्थान देहूचे अध्यक्ष हभप पुरुषोत्तम महाराज मोरे, विश्वस्त भानुदास महाराज मोरे, माणिक महाराज मोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कथा श्रवण केले. "कोणाचे चांगले करू शकत नसाल, तर वाईटही करू नका. आपल्याकडून चांगले घडावे यासाठी प्रयत्नशील रहा. तो असा वागतो, म्हणून मी देखील असाच वागणार, अशा प्रकारचे वागणे टाळणे गरजेचे आहे. स्वत:ची तुलना इतरांशी करण्याचा प्रयत्न टाळा, यामुळे दुसऱ्यासारखे वागण्याचा प्रयत्न करताना तुम्ही स्वत:चा देखील आनंद गमावून बसाल, असे पं. प्रदीपजी मिश्रा यांनी यावेळी सांगितले. शिवकथा हे जीवनाचे सार आहे. यातून मिळणाऱ्या सकारात्मक संदेशाने आपले जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करा. शिवमहापुराण कथा पं. प्रदीपजी मिश्रा यांच्या वाणीतून ऐकताना आपण मंत्रमुग्ध होवून जातो. या कथेचा प्रभाव हा दीर्घकाळ टिकणारा आहे.





### लक्ष्मणभाऊ जगताप यांची पुण्याई

» लोकनेते लक्ष्मण जगताप आज आपल्यात नसले तरी त्यांची पुण्याई आपल्यासोबत आहे. त्याच पुण्याईने शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यासाठी जगताप कुटुंबियांना प्रोत्साहित केले. कथा सोहळ्याचे आयोजन ही सहज शक्य गोष्ट नसली, तरी केवळ कर्मच अशा गोष्टी घडविण्यासाठी पाठबळ देते. लक्ष्मणभाऊंची पुण्याई आजही जगताप कुटुंबियांच्या पाठीशी आहे, म्हणूनच त्यांच्या वतीने आयोजित सोहळ्याचा लाभ लाखो नागरिक घेवू शकले आहेत. असे म्हणत पं. प्रदीपजी मिश्रा यांनी जगताप कुटुंबियांचे मनापासून कौतुक केले.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घेतले 'दगडूशेठ' गणपतीचे दर्शन!

## गणपती दर्शनासाठी बावनकुळेंचा विना हेल्मेट प्रवास



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी सायंकाळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी गणरायाची आरती देखील केली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३१ व्या वर्षी गणेशोत्सवात देवेंद्र फडणवीस यांचे सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे सरचिटणीस हेमंत रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, उपाध्यक्ष सुनील रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सरचिटणीस अमोल केदारी यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पुणे दौऱ्यावेळी कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती व केसरी गणपती या पुण्यातील मानाच्या पहिल्या पाच गणपतींचे दर्शन घेण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्रॅफिकमुळे कार्यकर्त्यांसह दुचाकीवर प्रवास केला. पुण्यातील रस्त्यावरील गर्दी लक्षात घेऊन वाहनांचा ताफा टाळत चंद्रकांत पाटलांनी मागील वर्षी एका ट्रॅफिक पोलिसांच्या मोटरसायकलवर मागे बसून प्रवास केला आहे. त्यांनी पुण्याचे ग्रामदैवत असलेल्या कसबा गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर भाऊ रंगारी गणपतीच्या प्रतिष्ठापणेसाठी ते जाण्यासाठी निघाले होते. मात्र रस्त्यावरील गर्दी पाहता त्यांनी वाहनांचा ताफा टाळत एका ट्रॅफिक पोलिसाच्या मोटरसायकलवर बसून प्रवास केला. त्यांनी हा प्रवास करत असतांना विनाहेल्मीट प्रवास केल्याने त्यांच्यावर टीका करण्यात आली होती.

### मागील वर्षी चंद्रकांत पाटलांचा प्रवास

**» पुण्यातील रस्त्यावरील गर्दी लक्षात घेऊन वाहनांचा ताफा टाळत चंद्रकांत पाटलांनी मागील वर्षी एका ट्रॅफिक पोलिसांच्या मोटरसायकलवर मागे बसून प्रवास केला आहे. त्यांनी पुण्याचे ग्रामदैवत असलेल्या कसबा गणपतीचे दर्शन घेतले. त्यानंतर भाऊ रंगारी गणपतीच्या प्रतिष्ठापणेसाठी ते जाण्यासाठी निघाले होते. पुणे दौऱ्यावेळी कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती व केसरी गणपती या पुण्यातील मानाच्या पहिल्या पाच गणपतींचे दर्शन घेण्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी ट्रॅफिकमुळे कार्यकर्त्यांसह दुचाकीवर प्रवास केला.**

# पुणे पालिकेचा अजब कारभार!

## करार न करताच ८२ ठिकाणी चार्जिंग स्थानके



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पर्यावरणपूरक ई-वाहनांसाठी महापालिकेने ई-चार्जिंग स्थानके उभारण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी ८२ ठिकाणी चार्जिंग स्थानके उभाण्याचा प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मात्र, त्यासंदर्भातील करार महापालिकेने ठेकेदाराबरोबर केला नसल्याचे पुढे आले आहे. त्यानंतरही हव्या त्या मोक्याच्या जागा महापालिकेकडून ठेकेदाराला देण्याचा घाट घालण्यात आला आहे. शहरातील ई-वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे ई-चार्जिंग स्थानके उभारण्याचे धोरण महापालिकेने स्वीकारले आहे. त्यानुसार शहरात ८२ ठिकाणी चार्जिंग स्थानके उभारण्यात येणार आहेत. त्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर महापालिकेने संबंधित ठेकेदाराला कार्य आदेशही दिला आहे. त्यानंतरही मोक्याच्या जागा ठेकेदाराला देण्याचा घाट महापालिका घालत आहे. उद्यान, क्षेत्रीय कार्यालय, नाट्यगृह, रुग्णालय, वाहनतळ येथे चार्जिंग स्थानके उभारण्यासाठी महापालिकेने निविदा काढली होती. या निविदेमध्ये संबंधित कंपनीला मोक्याच्या जागा आठ वर्षांसाठी विनामूल्य वापरता येतील. ठेकेदाराला मिळणाऱ्या नफ्यापैकी ५० टक्के हिस्सा महापालिकेला मिळेल. चार्जिंगसाठी यंत्रसामग्री, मोबाईल ॲप्लिकेशन, वीज मीटर घेणे, विद्युत देयकाची रक्कम भरणे चार्जिंग स्थानके सुरू ठेवणे, अशा अटी आहेत. ठेकेदाराकडून पालिकेकडे २५ लाख रुपये बँक हमी घेणे यासह इतर अटी आहेत.

### जागा ठेकेदाराला देण्याचा घाट

**» शहरातील ई-वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे ई-चार्जिंग स्थानके उभारण्याचे धोरण महापालिकेने स्वीकारले आहे. त्यानुसार शहरात ८२ ठिकाणी चार्जिंग स्थानके उभारण्यात येणार आहेत. त्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर महापालिकेने संबंधित ठेकेदाराला कार्य आदेशही दिला आहे. मात्र प्रस्तावानुसार करार केला नसल्याचे पुढे आले आहे.**

# मेट्रोचे काम २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे आव्हान!

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** हिंजवडीतील माहिती-तंत्रज्ञान (आयटी) केंद्राला शिवाजीनगरच्या मध्यवर्ती केंद्राशी जोडणाऱ्या पुणेरी मेट्रो प्रकल्पाच्या कामाने वेग पकडला आहे. मागील १४ महिन्यांत या प्रकल्पाचे सुमारे ४५ टक्के काम पूर्ण झाले आहे. उरलेले काम मार्च २०२५ पर्यंत १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे आव्हान आहे. या मार्गिकेसाठीच्या चार हजार सेगमेंटची उभारणी पूर्ण करण्यात आली असून, ८० टक्के खांबाची उभारणीही पूर्ण झाली आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मार्गावरील पुणे मेट्रो मार्ग ३ चे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर टाटा समूहाने हाती घेतले आहे. त्याच्या कार्यान्वयासाठी पुणे आयटी सिटी मेट्रो रेल लिमिटेड या स्पेशल पर्पज व्हेईकल (एसपीव्ही) कंपनीची स्थापना करण्यात आलेली आहे. या प्रकल्पाला पुणेरी मेट्रो असे नाव देण्यात आले आहे. या प्रकल्पासाठीचे भूसंपादन पूर्ण झाले असून, मेट्रो मार्ग उभारणीचे काम वेगाने सुरू आहे. प्रकल्प पूर्ण होण्याची मुदत मार्च २०२५ आहे. त्यामुळे आगामी काळात मेट्रो मार्गांची उभारणी, गणेश खिंड रस्त्यावरील दुमजली उड्डाणपूल आणि मेट्रो स्थानकांचे काम करण्याचे आव्हान आहे.

# कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी राज्य सरकारकडून २०० कोटी मिळेनात!

## सातव्या वेतन आयोगाच्या निधीतील ३० कोटी खर्च करणार पालिका

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कात्रज-कोंढवा रस्त्याच्या भूसंपादनासाठी राज्य शासनाकडून २०० कोटी रुपये देण्याची घोषणा झाली असली तरी हा निधी महापालिकेला अद्याप मिळालेला नाही. या रस्त्यावर सातत्याने लहान-मोठे अपघात होत असल्याने आणि निधी अभावी भूसंपादनाची प्रक्रिया तसेच अन्य कामे रखडल्याने महापालिका प्रशासनाने सातव्या वेतन आयोगाच्या निधीतून रस्त्याच्या कामासाठी ३० कोटींचा निधी मंजूर केला आहे. सातव्या वेतन आयोगाच्या निधीतून निधी देण्याचा वर्गीकरणाचा प्रस्तावाला स्थायी समितीनेही मंजुरी दिली आहे. कात्रज-कोंढवा रस्त्यासाठी सध्या भूसंपादनासाठी ७०० कोटींची आवश्यकता आहे. निधी अभावी रस्त्याचे काम रखडले आहे. या रस्त्यांच्या रुंदीकरणाला मंजुरी देताना रस्त्याची रुंदी ८४ मीटर एवढी प्रस्तावित करण्यात आली होती. मात्र, रस्त्याची रुंदी ५० मीटर एवढी करण्यात येणार आहे. त्यामुळे रस्त्यासाठी भूसंपादनही कमी करावे लागणार असून, त्यासाठी २७७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी दोनशे कोटींचा निधी राज्य शासनाने महापालिकेला द्यावा, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून



राज्य शासनाला पाठिवण्यात आला होता. उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांना हा निधी दिला जाईल, अशी घोषणाही केली होती. राज्याच्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यात हा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र तो अद्यापही महापालिकेला प्राप्त झालेला नाही. कात्रज-कोंढवा रस्त्यावर सातत्याने लहान-मोठे अपघात होत आहेत. त्यामुळे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, आयुक्त विक्रम कुमार यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या कामाची पाहणी केली होती. त्यावेळी ऑक्टोबर अखेरपर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून मार्च अखेरपर्यंत रस्ता रुंदीकरणाची कामे पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले होते.

### २७७ कोटींचा खर्च अपेक्षित


» रस्त्यासाठी भूसंपादनही कमी करावे लागणार असून, त्यासाठी २७७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी दोनशे कोटींचा निधी राज्य शासनाने महापालिकेला द्यावा, असा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून राज्य शासनाला पाठिवण्यात आला होता. उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांना हा निधी दिला जाईल, अशी घोषणाही केली होती. राज्याच्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यात हा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र तो अद्यापही महापालिकेला प्राप्त झालेला नाही.

महापालिकेला प्रकल्पाच्या व्यवस्थापन सल्लागाराचे शुल्कापोटी ११ लाख ९४ हजार ३०४ रुपये, जागेचा मोबदला १५ कोटी ३७ लाख ४५ हजार ९०० रुपये, केबल स्थलांतरित करणे यासाठी १ कोटी १ लख २० हजार १०८ रुपये असे एकूण १६ कोटी ५० लाख ६० हजार ३१२ रुपयांची महापालिकेला तातडीची आवश्यकता आहे. त्यामुळे सातव्या वेतन आयोगाच्या निधीतून ही रक्कम घेण्यात आली आहे. सातव्या वेतन आयोगासाठी १३० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी ३० कोटींचा निधी या कामांसाठी घेण्यात येणार आहे.

# उद्योग जगताने व्यापक दृष्टिकोन ठेवावा!

## सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे प्रतिपादन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शेतकरी स्वत:साठी अन्नधान्य पिकवत नाही, तर तो समाजासाठी शेती करतो. त्याप्रमाणे उद्योगजगाने व्यापक दृष्टिकोन ठेवून समाजाच्या भल्याचा विचार करावा. समाजाच्या भरभराटीतच वैयक्तिक भरभराट दडलेली असते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. भारतीय अर्थव्यवस्थेमागील तत्वज्ञान अन्य देशांपेक्षा वेगळे आहे. औद्योगिकीकरण, शाश्वत ऊर्जेचा वापर आणि उद्योगात मानवी दृष्टिकोन ठेवावा, असे आवाहनही डॉ. भागवत



यांनी केले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चर (एमसीसीआय) पुणे या संस्थेच्या वतीने आयोजित 'भारतीय अर्थविषय धोरणांविषयीचे तत्वज्ञान' या विषयावर डॉ. भागवत बोलत होते. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष दीपक करंदीकर, महासंचालक प्रशांत गिरबने यावेळी उपस्थित होते. उद्योग आणि अर्थव्यवस्थेच्या अनेक बाबींवर भागवत यांनी भूमिका मांडली. या कार्यक्रमाला ३०० हून अधिक उद्योजक उपस्थित होते. डॉ. भागवत म्हणाले की, भारतीय अर्थव्यवस्था, उद्योग सगळ्यांच्या फायद्यासाठी करावा, या तत्वावर आधारित आहे. उद्योगपतींनी आपण उद्योगाचे मालक नाही तर विश्वस्त आहोत, हा विचार कायम मनात ठेवावा. भारतीय अर्थव्यवस्थेमागील तत्वज्ञान अन्य देशांपेक्षा वेगळे आहे. इतिहासकालीन दाखल्यातूनही ही बाब स्पष्ट झाली आहे. भारतीय उद्योगाचा पाया समाजाचा फायदा बघण्यासाठी आहे. औद्योगिकीकरण, शाश्वत ऊर्जेचा वापर आणि उद्योगात मानवी दृष्टिकोन बाळगणे आवश्यक आहे. पैशाच्या संपत्तीपेक्षा बुद्धीची संपत्ती महत्वाची आहे, हा भारतीय संस्कृतीमधील विचारही विसरता कामा नये. त्यानुसार स्वत:च्या उपभोगासाठी, भविष्याची तरतूद, धार्मिक कार्यांसाठी, समाजासाठी, राज्यकर्त्यांसाठी आणि निकडीच्या प्रसंगी संपत्तीचे समान भाग करावे, अशी सूचना भागवत यांनी केली.

# पत्नीनेच पतीकडून उकळली खंडणी!

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** खोट्या गुन्ह्यात अडकविण्याबरोबरच जीवे ठार मारण्याची धमकी देत पत्नीने पतीच्या बँक खात्यातून परस्पर २१ लाख ९० हजार रुपये काढून घेतले. त्यानंतर पतीला २९ लाख २६ हजार रुपयांचे कर्ज घेण्यास भाग पाडून खंडणी उकळली. याप्रकरणी, मर्चंट नेव्हीत नोकरीस असलेल्या ३५ वर्षीय पतीने विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी पत्नी, तिचा मित्र, आई-वडील आणि भाऊ अशा पाच जणांच्या विरुद्ध फसवणूक, खंडणी, अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ऑक्टोबर २०२२ ते गुन्हा दाखल होईपर्यंतच्या कालावधीत घडली आहे. त्यांच्यापासून हे लपवून ठेवत पैसे मिळविण्याच्या हेतूने लग्न केले. त्यानंतर मित्र आणि इतरांसोबत संगणमत करून पत्नीने फिर्यादींना त्यांची महत्वाची कागदपत्रे जाळण्याची धमकी दिली. एवढेच नाही तर खोट्या गुन्ह्यात अडकविण्या बरोबरच जीवे ठार मारण्याची धमकी देत फिर्यादींकडून वेळोवेळी व त्यांच्या बँक खात्यातून परस्पर २१ लाख ९० हजार रुपये आणि त्यांना कर्ज घेण्यास भाग पाडून २९ लाख २६ हजार रुपये आणि त्यांच्या मालकी वस्तू ताब्यात घेतल्या. फिर्यादींना मानसिक व शारिरीक त्रास दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.